# NANDED WAGHALA CITY MUNICIPAL CORPORATION, NANDEDE-TENDER NOTICE

E-Tender Notice No: - NWCMC/HealthDept/ E-Tender/ 65 /२०२५Date: -25/02/2025

आयुक्त, नांदेडवाघाळाशहरमहानगरपालिका नांदेड हे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान १५ वा वित्त आयोग अंतर्गत अधिनस्त शहरी आरोग्य वर्धिनि केंद्रासाठी अत्यावश्यक औषधी व इतर साहित्या चे दर निश्चित करुन वेळोवेळी अवश्यकते नुसार माहे जानेवारी २०२५ ते मार्च २०२६पर्यंतसाठीखरेदी करणे करीता जाहीर ई-निविदा मागविण्यात येत आहे. संपुर्ण निविदा हि ई-निविदा प्रणालीद्वारे संगणकीय अज्ञावलीत व दोन लिफाफा पध्दतीने होईल.निविदा लिफाफा क्रः -१ (Technical Envelop) व निविदा लिफाफा क्रः -२ (Financial Envelop)

**<u>निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक</u>**

| अ.क्र | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | ई-निविदाप्रकाशित करणे | 27/02/2025 | १५.०० |
| २. | ई-निविदाडाऊनलोड करणे | 27/02/2025 | १५.०० |
| ३. | ई-निविदाभरणे | 27/02/2025 | १५.०० |
| ४. | ई-निविदाभरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 07/03/2025 | १५.०० |
| ५. | ई-निविदाउघडणे | 10/03/2025 | १५.०० |

**-: कामाचे स्वरुप :-**

| टेंडरक्र. | कामाचेनाव | इसारारक्कम (EMD) | को-यानिविदेचीकिंमत | अनामत रक्कम | कामाचीमुदत |
|---|---|---|---|---|---|
| १. | नांदेडवाघाळाशहरमहानगरपालिका नांदेड अंतर्गत शहरी आरोग्य वर्धिनि केंद्रासाठी लागणारे अत्यावश्यक औषधी व इतर साहित्याचे दरमाहे जानेवारी २०२५ ते मार्च २०२६पर्यंतसाठी निश्चित करुन वेळोवेळी अवश्यकते नुसारखरेदी करणे. | ५,४०,०००/- | ३७,५००/- | पुरवठा आदेशाच्या ३% इतकी रक्कम | पुरवठाआदेशा प्रमाणे. |

## <u>नियम व अटी</u>

१. निविदाधारकांने निविदा लिफाफा क्रः -१ (Technical Envelop)यामध्येखालील प्रमाणे कागदपत्र जोडणे बंधनकारक आहे.

अ. निविदधारकाने इसारा (EMD) रक्कम आणि को-या निविदेची रक्कम (Tender Fees)ऑनलाईन भरणा केलेल्या पावतीची छायांकित प्रतजोडणे बंधनकारक आहे.

आ. महाराष्ट्र दुकाने व संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र जोडावे, निविदाधारक हा उत्पादक असेल तर Certificate Of Incorporation जोडावे.

इ. GST नोंदणी प्रमाणपत्र जोडावे. माहे मार्च २०२५ चे **<u>GST Clearance Certificate</u>**जोडणे बंधनकारक आहे.

ई. निविदाधारक हा उत्पादक अथवा पुरवठादार असल्याचे कागदपत्र जोडावे. (निविदाधारक हा उत्पादक असल्यास **<u>उत्पादकाचा परवाना</u>**किंवा निविदाधारक हा पुरवठादार असेल तर **<u>उत्पादकाचे अधिकृत वितरक</u>** असल्याचे प्रमाणपत्र उत्पादकाच्या लेटर हेड वर सविस्तरपणे नमुद करुन जोडणे बंधनकारक आहे.)

उ. निविदाधारकाने अन्न व औषध प्रशासन (FDA)यांचे **<u>औषध परवाना</u> (Drug License)** ची वैध प्रत जोडणे बंधनकारक आहे.

ए. निविदाधारकाने फर्मच्या नावे असलेल्या आयकर विभागाचे **<u>पॅन/टॅन (PAN/TAN)</u>** कार्डची छायांकित प्रत जोडावी. (जर निविदाधारक हा Proprietor असेल तर Proprietor च्या नावाची**<u>पॅन/टॅन(PAN/TAN)</u>** कार्डची छायांकित प्रत जोडावी.)

ऐ. निविदाधारकाने मागील ३ वर्षात कोणत्याही शासकिय/निम शासकिय संस्थेस पुरवठा केलेल्या औषधींचा किमान तपशील (Annexure-1 ) मध्ये नमुद करावा.

ओ. निविदाधारकाने मागिल तीन वर्षाची (२०२४-२५, २०२३-२४, २०२२-२३) अर्थिक उलाढाल, नफा-तोटा बॅलेंसशिट बाबत चे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र. (दर वर्षाचा आर्थिक उलाढाल किमान रु. ३ कोटी असावी.)

औ. निविदाधारकाने मागिल तीन वर्षाची २०२४-२५, २०२३-२४, २०२२-२३) आयकर विभागाचे विवरण पत्र जोडावे.

अं. निविदाधारकाने अन्न व औषध प्रशासन (FDA) यांचेवैध Non Conviction Certificate जोडणे बंधनकारक आहे.

अः. निविदाधारकाने खालिलप्रमाणे नमुद केलेली माहिती फर्म च्या लेटर हेड वर स्वाक्षरी व शिक्का सहीत देणे बंधनकारक आहे.

a. No FIR in any Police Station.
b. No any incidence of spurious drugs.
c. No any inquiry of FDA department towards the sales and purchase of medicine.
d. No any enquiry or Judicial case is pending against Tenderer.

क. निवदाधारकाने उत्पादकाकडुन Market Standing बाबतचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.

ख. निविदधारकाने सर्व कागदपत्रे खरी असल्याचे प्रतीज्ञापत्र (500/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर) जोडणेबंधनकारक आहे. तसेच सदरील प्रतीज्ञापत्र (500/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरची Original copy) या कार्यालयाच्या पत्त्यावर पोस्टाने पाठविणे किंवा स्वतः या कार्यालयात विहीत मुद्दातीत जमा करणे बंधनकारक आहे.ई-निविदेच्या प्रक्रियेमध्ये आपण जोडलेली कागदपत्र खोटीव बनावट असल्याची बाब निदर्शनात आढळले तर कायदेशीर कार्यवाहीस निविदाधारक पुर्णपणे जबाबदार राहतील, मनपाचे कोणतेही अधिकारी/कर्मचारी जबाबदार असणार नाहीत.

ग. निविदाधारकाचे महानगरपालिकेतील कोणत्याही कार्यरत अधिकारी, पदाधिकारी किंवा कर्मचारी यांचेसोबत संबंध नसल्याबाबत चे स्वय घोषणा पत्र फर्म च्या लेटर हेड वर स्वाक्षरी व शिक्का सहीत देणे बंधनकारक आहे.

घ. निविदाधारकाने पुरवठा करण्यात येणा-या औषधींच्या उत्पादकाची माहिती परिशिष्ठ-१ (Annexure-1) मध्ये भरणे बंधनकारक आहे. नमुद केलेल्याच उत्पादकाचे दर व औषधी स्विकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.

## इतर सर्वसाधरण नियम व अटी

१. निविदे बाबतची संपुर्ण माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन उपलब्ध आहे व महिती सदरिल संकेतस्थळावरुन Download करुन घेता येईल

२. पुरवठा आदेश दिल्यानंतर औषधींचा पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्यास सदर बाब ही अत्यावश्यक असल्याने पुरवठा न केलेल्या औषधीच्या ३% टक्के रक्कम दंड म्हणुन आपल्या सुरक्षा ठेवीच्या रक्कमेतुन कपात करण्यात येईल.

३. निवड झालेल्या निविदाधारकास औषधींचा पुरवठा करण्यापुर्वी सुरक्षा अनामत ठेव रक्कम पुरवठा आदेशाच्या ३% टक्के या दराने भरणा करावी लागेल. पुरवठा आदेशातील औषधी औषध-भांडारास प्राप्त झाल्यानंतर व सदरील देयक अदाई झाल्यानंतरच सुरक्षा अनामत ठेव रक्कम परत केली जाईल, तथापी या रक्कमेवर निविदाधारकास कुठल्याच प्रकारचे व्याज लागु होणार नाही.

४. आवश्यकते प्रमाणे या कार्यालयास योग्य वाटल्यास, पुरवठा आदेश एकापेक्षा जास्त न्युनतम निविदाधारकास विभागुन देण्यात येईल, तथापी असे करण्यापुर्वी न्युनतम निविदाधारकास वाटाघाटीसाठी या कार्यालयात बोलविण्यात येईल.

५. WHO GMP Certified उत्पादकाकडुन उत्पादन केलेल्या औषधींचा पुरवठा करणे बंधनकारक आहे.

६. पुरवठा करण्यात येणा-या औषधींचे तपासणी अहवाल (Certificate of Analysis) जोडणे बंधनकारक आहे.

७. पुरवठा करण्यात येणारी औषधी ही निविदेतील विर्निदेशाप्रमाणे (Technical Specification) आहे किंवा नाही याची खातर जमा करण्यासाठी सदरील औषधाचे नमुने हे FDA विभाग किंवा NABL accredited प्रयोग शाळेकडुन तपासणी करुणं घेण्यात येईल. FDA किंवा NABL accredited प्रयोग शाळेकडुन प्राप्त अहवाल अप्रमाणित दर्जाचा घोषीत झाल्यास सदरिल औषधी तातडीने बदलुन देणे बंधनकारक राहिल.

८. पुरवठा करण्यात आलेली औषधी बनावट (Spurious) आढळुन आल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. पुरवठा करण्यात येणार्या औषधींच्या उत्पादनाची तारीख व मुद्दत बाह्य तारीख ही किमान ३/४ असावी. (Mfg. date & Exp date ¾ Shelf-life period) आसणे आवश्यक आहे, जवळच्या मुदतबाह्य दिनांकाची औषधी स्विकारणात येणार नाही.

९. निविदेतील BOQ मध्ये नमुद सर्व औषधींचे दर हे प्रति नग (Single Unit) प्रमाणे सर्व करासहीत (GST), तसेच FOR (Freight on road) औषधी भांडार, शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, स्टेडियम परिसर, गोकुळनगर, नांदेड-431601 या ठिकाणचे असावेत. औषधींचा पुरवठा शक्यातो रस्ता वाहतुकिने (Road Transport) करावा.

१०. निविदाधारकाने निविदेतील BOQ मध्ये सर्व औषधींचे दर भरणे बंधनकारक राहिल अन्यथा अपुर्ण BOQ ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

११. निर्धारीत वेळेत अथवा विस्तारीत वेळेत खरेदी किंवा पुरवठा आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास संबंधिताचा पुरवठा आदेश अंशतः किंवा पुर्णतः रद्द करण्याचे आधिकार निम्न स्वाक्षरीधारक यांनी राखुन ठेवला आहे. अश्या कारणांनमुळे पुरवठा आदेश रद्द झाल्यास संबंधितास सुरक्षा ठेव अनामत रक्कम परत दिली जाणार नाही याची निविदाधारकाने नोंद घ्यावी. तसेच पुरवठा आदेश दुसर्या न्युनतम निविदाधारकास देण्यात येईल किंवा निम्न स्वाक्षरीधारक योग्य तो निर्णय घेतील.

१२. पुरवठा करण्यात येणार्या औषधींचा वाहतुकी दरम्यान काही तोडफोड किंवा नुकसान झाल्यास संबंधित औषधी बदलुन देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहिल.

१३. औषधी पुरवठा करावयाचा कालावधी हा पुरवठा आदेशात नमुद अटी प्रमाणे राहिल, तथापी नैसर्गिक आपत्ती (पुर, आग, ईत्यादी), सार्वजनिक काम, युद्ध, कामगार बंद अश्या कारणांन मुळे हा कालवधी वाढविला जाऊ शकतो. औषधींचा पुरवठा हा आदेशीत केलेल्या कालावधीत न झाल्यास विलंब शुल्क

म्हणुन खालिलप्रमाणे दंड आकरण्यात येईल.

| Category of Store | Penalty Amount |
|---|---|
| The case of an order not exceeding Rs.2.00 Lakh in value | At the rate of ½ % per week subject to maximum limit of 10% |
| The case of an order exceeding Rs.2.00 Lakh & above | At the rate of ½ % per week subject to maximum limit of 5% |

१४. **a) Risk Purchase:** The contractor fails to deliver the stores of any instalment thereof within the period fixed for such delivery or at any time repudiates the contract before the expiry of such period, the Government is entitled to cancel the contract and repurchase the stores not delivered at the risk and cost of the defaulting contractor. In the event of such a risk purchase, the defaulting contractor shall be liable for any loss which the Government may sustain on that account provided the purchase, or if there is an agreement to purchase, such agreement is made, in case of default to deliver the stores by the stipulated delivery period, within two months from the date of such default and in case of repudiation of the contract before the expiry of the aforesaid delivery, within two months from the date of cancellation of the contract.

**b) Fall Clause:** It is a condition of the contract that all through the currency thereof, the price at which you will the supply stores should not exceed the lowest price charged by you to any customer during the currency of the rate contract and that in the event of the prices going down below the rate contract prices you shall promptly furnish such information to us to unable to amend the contract rates for subsequent supplies.

**c) Force Majeure Clause:** "If, at any time, during the continuance of this contract the performance in whole or in part by either party of any obligation under this contract shall be prevented of delayed by reason of any war, hostility, acts of the public enemy, civil commotion, sabotage, fires, floods, explosions, epidemics, quarantine restriction, strikes, lock-outs or acts of God (hereinafter referred to as "events"), provided notice of happening of any such eventuality is given by either party to the other within 21 days from the date of occurrence thereof, neither party shall by reason of such event, be entitled to terminate this contract nor shall either party have any claim for damages against the other in respect of such nonperformance or delay in performance; and deliveries under the contract shall be resumed as soon as practicable after such event has come to an end or ceased to exist, and the decision of the purchasing officer as to whether the deliveries have been so resumed or not, shall be final and conclusive, provided further that if the performance in whole or part of any obligation under this contract is prevented or delayed by reason of any such event for a period exceeding 60 days, either party may at its option terminate the contract PROVIDED ALSO that it the contract is terminated under this clause, the purchaser shall be at liberty take over from the contract at a price to be fixed by the purchasing Officer which shall be final all unused, undamaged and acceptable materials, bought out components and stores in course of manufacture in the possession of the contractor at the time of such termination or such portion there of as the purchaser may deem fit accepting such material, bought out components and stores as the contractor may with the concurrence of the purchaser elect to retain.

**d) Important factors relating to placement of contracts Force Majeure Clause-**

The force majeure clause in the following form only (which will not form part of the general conditions of contracts) should be included in such contracts where the suppliers specifically insists on the provision of a force majeure clause and there is no alternative but to accept the same. This clause should not be incorporated in the Invitation to Tender, but prior to acceptance of an offer in such a case the supplier should be asked to accept this clause as governing conditions of force majeure.

१५. पुरवठा करण्यात येणार्या औषधींच्या वेष्टनावर औषधी चे नाव, उत्पादक तारिख, मद्दत बाह्य तारिख, समुह क्र. (Batch No.), For Use of Govt. of Maharashtra only, Not for Sale, ई. बाबी ठळक अक्षरात मुद्रीत करावे.

१६. सदरिल निविदेसंदर्भात काही वाद-विवाद निर्माण झाल्यास ते नांदेड न्यायालय अंतर्गत (Subject to Nanded Jurisdiction only) राहुनच सोडविण्यात येईल

१७. वरिल निविदा स्विकारण्याचा किंवा कोणतेही कारण न दर्शविता संपुर्ण किंवा अंशतः निविदा नाकरण्याचा किंवा कोणतेही बदल करण्याचा किंवा कोणत्याही औषधींच्या संख्येमध्ये कमी किंवा जास्त करण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी राखुन ठेवला आहे.

स्वा/-
आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**प्रतिलिपी माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव :-**

१) मुख्यलेखा परीक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
२) मुख्यलेखा व वित्त अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
३) अंतर्गत लेखापरीक्षण, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
४) संगणक व्यवस्थापक, संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
५) मुख्य कार्यालय नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.